# वाङ्मयीन संदर्भ
## आणि
# अवलोकन

डॉ. सोमनाथ कोमरपंत

मित्र प्रकाशन

# वाङ्मयीन संदर्भ आणि अवलोकन...

प्रथमावृत्ती : १५ ऑगष्ट १९९२

० प्रकाशन क्र. - ४

© सौ. मंदा सोमनाथ कोमरपंत

० प्रकाशक :
भालचंद्र गांवकर
मित्र प्रकाशन
किटोर्ले - बेतोडा
फोंडा - गोवा ४०३ ४०९.

० मुद्रक :
सम्राट ऑफसेट प्रिंटर्स
बाणस्तारी - गोवा.

० मुखपृष्ठ :
गोविंद नाईक

० मूल्य :
मित्र प्रकाशन
रु. ८०/-

# संत सोहिरोबानाथ आंबिये यांची कविता

संत सोहिरोबानाथ आंबिये हे अठराव्या शतकातील थोर गोमंतकीय कवी. गोमंतकातील मराठी कविपरंपरेत त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. अखंड स्वाध्याय, प्रज्ञा आणि आत्मानुभव उत्कटतेने व्यक्त करण्याचा ध्यास हे त्यांच्या प्रतिभाधर्माचे विशेष आहेत. या प्रज्ञावंत कवीचा पिंड पारमार्थिक आहे. अर्थात त्यांची प्रतिभा अध्यात्मचिंतनात सतत मग्न राहिली. आत्मसंवादात रंगली. आत्मा आणि परमात्मा यांतील आंतरिक व अभिन्न नात्याचे दर्शन या जीवनसाधकाला घडलेले होते. त्या साक्षात्कारानुभूतीने सोहिरोबानाथांचे अवघे काव्यविश्व दीप्तिमान झालेले आहे. लौकिकापेक्षा पारलौकिकाकडे या काव्याचा ओढा आहे. त्यात भक्तीचा गोडवा आहे. आत्मशुद्धीचा मार्ग स्वतः सोहिरोबानाथांनी स्वीकारला आणि जनमानसात त्याचा सातत्याने पुरस्कार केला. सोहिरोबानाथ जाऊन दोनशे वर्षे उलटून गेली. बदलत्या कालानुसार समाजमानसाची बैठक अध्यात्मप्रवण राहिलेली नाही. पण मानवाला चित्तशुद्धीचा मार्ग दाखविणारी त्यांची कविता आजही दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देणारी आहे. मनुष्यमात्राचे उन्नयन करण्याची अंतःप्रेरणा तीत आहे. सोहिरोबानाथांची कविता ही त्यांच्या अखंड जीवनसाधनेतून कळीतून फूल उमलावे इतक्या सहजतेने स्फुरलेली आहे. तिचा सुगंध गोमंतभूमीत व कोकणात दरवळत आहे. एवढेच नव्हे तर त्यांची कविता संपूर्ण मराठी काव्यविश्वाचा अभिमानाचा विषय बनली आहे. श्रेष्ठ प्रतिभावंत आणि त्याची काव्यशक्ती विशिष्ट प्रदेशाच्या कुंपणात बंदिस्त राहत नाही. 'अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे' असे आर्ततेने व उत्कटतेने सांगणारे संत सोहिरोबानाथ 'साकल्याच्या प्रदेशा'चे रहिवासी झाले आहेत आणि आत्मानुभूतीचा स्पर्श असलेले त्यांचे काव्य नव्या संवेदनशीलतेच्या रसिकांनाही आनंद देणारे ठरले आहे.

संत सोहिरोबानाथांच्या कवितेवर पूर्वकालीन संतांचे गाढ संस्कार झालेले आहेत. संतकाव्यात आढळणारा अम्लान आशय याही कवितेत आहे. पण केवळ आनंदविश्वात रममाण करणे हे संतकाव्याचे प्रयोजन नव्हे. संतांनी आत्मोद्धाराचा मार्ग स्वीकारला. दुसऱ्यांना सांगितला. समाजाची सांस्कृतिक व मानसिक जडणघडण त्यामुळे झाली. संतसाहित्य प्रवृत्तिवादी नाही, असा आक्षेप नेहमी घेतला जातो. समाजाला या साहित्याने निष्क्रीय केले असेही मानले जाते. पण ते सर्वस्वी खरे नव्हे. या साहित्यामुळे आत्मिक शक्ती शबल होत नसते. ती सबळ व सतेज होते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास व तुकाराम यांनी आपल्या काव्याद्वारे हा समृद्ध वारसा दिलेला आहे. या परंपरेशी दुवा जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संत सोहिरोबानाथांच्या कवितेने केले आहे. हे त्यांचे आपल्यावरील अनंत

उपकार आहेत. वैयक्तिक जीवनात ही कविता उच्च आशाआकांक्षा प्रेरित करणारी आहे. अवतीभोवतीच्या तापत्रयाचा विसर पाडणारी आहे. सामाजिक दृष्ट्याही तिची मौलिकता आहे. गोमंतक पारतंत्र्यात असताना आपण केवळ राजकीय दृष्ट्या गुलामगिरीत नव्हतो. तर सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्याही विपन्नावस्थेत होतो. या अंधारयुगात सोहिरोबानाथांसारख्या कवीने आमच्या अंतरात्म्याची ज्योत विझू दिली नाही. समष्टिमनाला दिलासा दिला. नैतिकदृष्ट्या भरणपोषण केले. बाह्य दुःख झेलण्याचे आत्मिक सामर्थ्य दिले.

संत सोहिरोबानाथांच्या कवितेच्या अंतरंगाचा परिचय करून घेण्यापूर्वी त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व कसे घडले हे पाहणे जरूरीचे आहे. संत सोहिरोबा हे स्वतः नाथपंथीय होते. त्यांच्या काव्यात गैबीनाथांचा (गहिनीनाथांचा) वारंवार उल्लेख येतो. 'अलख निरंजन' व 'निर्गुण निरंजन निरामया'चा उल्लेख येतो. भागवत संप्रदायाचाही त्यांच्यावर प्रभाव आहे. ज्ञानेश्वरादि संतकवींच्या काव्याचे प्रगाढ संस्कार त्यांच्या कवितेवर झालेले आहेत असे मानायला खूप जागा आहे. सूफी पंथाच्या धर्मतत्वांचा परिचय त्यांनी करून घेतलेला होता. भारतीय तत्त्वज्ञानपर ग्रंथांचे त्यानी परिशीलन केलेले होते. 'त्यांच्या या सर्व कवितेत जे शेकडो पारिभाषिक शब्द आणि तत्त्वज्ञानविषयक संदर्भ आले आहेत त्यावरून वेद, उपनिषदे, षट्र्शन, ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता इ. संस्कार धर्मग्रंथ आणि प्राकृत काव्यपुराणे त्यांनी फार बारकाईने अभ्यासली होती असे निःसंदेहपणे म्हणता येते.' असे मत कविवर्य बा. भ. बोरकर यांनी व्यक्त केले आहे. (संत सोहिरोबानाथ आंबिये : चरित्र आणि काव्यपरिचय, स्वामी विवेकानंद सोसायटी, पणजी, १९७३, पृ. ४) सोहिरोबानाथांच्या कवितेत त्यांच्या समन्वयशील वृत्तीचे प्रतिबिंब पडलेले आहे. कोणत्याही रूढ तत्त्वप्रणालीचा एकांगी पुरस्कार त्यांनी केलेला नाही.

मनुष्यस्वभावाचे सूक्ष्म अवलोकन त्यांनी केलेले आहे. परिणत जीवनचिंतनाचे नवनीत म्हणजे संत साहिरोबानाथांची कविता होय.

'पूर्णाक्षरी', 'अक्षरबोध' व 'अद्वयानंद' हे त्यांचे वेदान्तपर स्फुट ग्रंथ असून 'सिद्धान्तसंहिता' हा ग्रंथ संस्कृत व मराठी असा मिश्र स्वरूपाचा आहे. देहाच्या रचनेवर त्यांनी 'सोहिरोबांची बखर' या नावाने तत्त्वज्ञानपर बखर लिहिली आहे.

सोहिरोबानाथांच्या स्फुट काव्यरचनेचे स्थूल मानाने वर्गीकरण केले असता असे आढळून येते त्यातील काही रचना सगुण भक्तिपर आहेत, काही मुमुक्षूची स्थितीचे वर्णन करणाऱ्या आहेत. काही कविता स्वानुभवावर आधारलेल्या आहेत, काही बोधपर आहेत आणि काहीत संतांची लक्षणे सांगितली आहेत. त्यांच्या या विविधांगी काव्यात विखुरलेल्या उपमा - दृष्टान्तांमुळे त्यांचा अध्यात्मविचार सुस्पष्ट होतो. अनुभवांचे सूक्ष्म कंगोरे उलगडले जातात. तत्त्वज्ञानातील गहन सिद्धान्तांचे विवेचन ते सहजतेने करतात. आशयसौंदर्याबरोबर आविष्काराचे मनोहर रूप

त्यांच्या कवितेला प्राप्त झालेले आहे.

त्यांच्या कवितेतील अंतःस्थ धारा भक्तीचीच असल्यामुळे भक्ताने परमेश्वराची केलेली आर्त आळवणी तीत प्रामुख्याने आढळते. मी - तू संवादाचे रूप काही कवितांना प्राप्त झाले आहे. अर्थात या 'मी' तील 'अहंत्व' सहजपणे गळून गेले आहे आणि 'विश्वचित्रातील चितारी' असलेल्या पतिपावन दीनदयाधन 'तू'ला महत्त्व दिले गेले आहे. हा करुणाकर ईश्वर कसा आहे ? तो परात्पर आहे. 'अंतरसाक्षी हृदयनुभवनदीप' आहे. त्यांची सेवा श्रवण, मनन आणि निदिध्यासाद्वारे निरंतर घडावी असे या परमभक्ताला वाटते. सगळे जीव तलगत तलगत चित्सिंधूच्या अंतरंगात प्रवेश करतात. तरंगांप्रमाणे त्यांतले काही उमटतात, काही भासमान होतात, तर काही नष्ट होतात. सिद्ध पुरुष जीवन तरून जाण्यासाठी नाना सिद्धान्त सांगतात. पण केवळ ईश्वरी प्रेरणेने बहुतेकांना देहाद्वारे देहातीत होण्याची संधी प्राप्त होते. परमतत्त्वाशी हृदयसंवाद करताना होणाऱ्या अननुभूत आनंदाचे वर्णन सोहिरोबानाथांनी 'वंदियला भगवन्त' या कवितेत केलेले आहे :

*'वंदियला भगवन्त । तो म्यां वंदियला भगवन्त''*

या आवर्तनातून कवीची आत्मतृप्ती प्रकट होते. हा भगवंत भवसिंधुतारक आहे. निजसुखकारक आहे. सज्जनरंजन आहे. याचे वर्णन करताना वेद मुके झाले. शेष याचे स्तवन योग्य प्रकारे करू शकत नाही. त्याचे रूप अनंत आहे. याला सर्वार्थाने जाणण्याचा मार्ग कोणता ? सोहिरोबानाथ सांगतात :

*''अनुभवि पाहणें । चित्सुखवनवसंत''*

त्यांनी आपल्या प्रतीतिधर्माची चुणूक 'चित्सुखवनवसंत' या अर्थघन प्रतिमेतून येथे दाखविली आहे. परमेश्वराशिवाय अन्यत्र आपले मन जडू नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. वैराग्यज्ञानाचा अखंडित स्वर खणखणीतपणे कानांत पडावा. प्रपंचरहाटात गुंतलेलो असताना मन कोठे अडू नये असे ते म्हणतात. 'ब्रह्मिंचे मोक्षद्वार' खुले व्हावे असे त्यांना वाटते. भगवंताचे स्मरण केल्याने होणाऱ्या नित्यसुखाचे वर्णन करताना ते म्हणतातः

*योगाभ्यासे झराल, अक्षय प्रेमार्ते पाझराल*
*निरंजनवनीं ठराल तेव्हा नित्यानंदे भराल हो*

'भगवंता, तुझी गोडी लाव रे' या कवितेत ते म्हणतात, 'हे भगवंता, तुझी गोडी लाव. त्यामुळे रज, तम आणि दुष्ट स्वभाव नाहीसा होईल. चिद्घन सहज अनंतरुपात सद्भाव निर्माण होईल. 'लय हे भगवन्ती जरी लाय' या कवितेत प्रपंचाच्या मायारूपाचे वर्णन विविध दृष्टान्ताद्वारे सोहिरोबानाथ करतात.

उदा. - •

*''जैसी अग्नींचे हे छाया कीं हे जाण नटाची जाया*
*अथवा मृगजलवत् हे माया तैसी वाटत ज्याला काया*
*अवघेचि मिथ्या दिसले हाय.''*

परमेश्वर प्रसन्न झाल्यावर भवपाश तुटतात. प्रसन्नतेची प्रभा मनाच्या अवकाशात पसरते. या पूर्ण विरक्तीच्या निरामय अवस्थेचे चित्रण त्यांनी अत्यंत तन्मयतेने केलेले आहे :

*नयनीं नयेचि दृश्याभास समूळ तुटला आशापाश*
*समग्र विकासलें आकाश चंद्रसूर्यावीण प्रकाश*
*चित्त हे महाशून्यीं स्थिर होय.*

भगवन्तभजनावाचून जीवन व्यर्थ जाते असे सोहिरोबानाथ सांगतात. निर्माणकर्त्याला विसरून जे प्रपंच करतात त्यांच्या नशिबात उणेपणा येतो. ज्याला आत्मकळा कळत नाही, त्याचा प्रपंच वाया जातो. शिकूनसुद्धा त्याचे जीवन उदरंभरण करणाऱ्या श्वानासारखेच आहे असे ते म्हणतात.

'विसरला हरिला जन्मापासून' या कवितेत हरीच्या विस्मरणाने माणसाचे पतन कसे होते याचे दर्शन सोहिरोबानाथंनी घडविले आहे. आपला कामधंदा करताना जो गोविंदाचे स्मरण करीत नाही तो इतरांची द्वेषनिंदा करण्यात मग्न राहतो. चिंतेने त्याला ग्रासले जाते. शब्दनादात तो गुंगून राहतो. शास्त्रविषयक काथ्याकूट करण्यात त्याला आनंद होतो. केवळ कीर्तीसाठी तो विद्या संपादन करतो. त्यामुळे त्याला अहंकाराची बाधा होते. नाना प्रकारच्या चंगीभंगीपणात त्याची बुद्धी नासून जाते.

नाशिवंत देहाकडे तो 'मी' रूपात पाहतो. त्यामुळे निरंतर आत्मस्तुतीत तो मग्न राहतो. संदेहाच्या रानात त्याची सतत भ्रमंती चालते. हरीचा विचार त्याच्या ध्यानीमनी नसतो. मोहमदिरेच्या नशेत तो मग्न असतो.

जे लटके आहे ते खरे मानल्यामुळे प्रपंचात त्याला त्रिविध ताप सहन करावे लागतात. त्याचा जन्म वाया जातो. त्याचे क्रियाकर्म निष्फळ ठरते. त्याने केवळ शरीर चर्माचे आवरण घेतलेले असते. पण त्याने मूलभूत वर्म जाणलेले नसते.

सोहिरोबानाथांनी देहाचे क्षणभंगुरत्व आणि आत्म्याचे अमरत्व यातील भेद या कवितेत चांगल्या प्रकारे विशद केलेला आहे. क्षणभंगुर देहाचे अवाजवी कौतुक केल्याने 'आत्म'तत्त्वाचे विस्मरण कसे होते व मनुष्यमात्र दुःखाच्या खाईत कसा पडतो याचे विदारक चित्र त्यांनी रंगविले आहे.

प्रपंचविषयक आसक्तीतून ज्याच्यामुळे मुक्ती लाभेल त्या परमेश्वराचे तू दर्शन घे असे सोहिरोबानाथ सांगतात. एका परीने तो जनसंवाद आहे, तसाच आत्मसंवाददेखील आहे. ज्याला आदी नाही, मध्य नाही आणि अंत नाही, वेद ज्याला 'नेति नेति' म्हणतात. ज्यापासून ॐकाराचा जन्म झालेला आहे. ब्रम्हा, विष्णू आणि हर या त्रिमूर्तींची निर्मिती ज्यापासून झालेली आहे, अवघ्या विश्वावर ज्याची अगम अगोचर सत्ता चालते. सहज लीला तो दर्शवितो. जारज, स्वेदज, अंडज आणि उद्भिज ज्याच्यापासून जन्मतात त्या परमेश्वराचे तू दर्शन घे असे ते विनवितात.

परमात्म्याच्या प्राप्तीमुळे होणाऱ्या अपरिमित सुखसंवेदनांची चित्रे सोहिरोबानाथांनी रेखाटली आहेत. कधी कधी त्या अनुभूतीला सहजोद्गार लाभतो. उदा.

*"तुजविण आणि नाही रे मज ।*
*कळोनि आले हे आजि सहज ।।*
*मन हा मयूर किं आनंदे नाचे ।*
*नाना अलख करणें वाचे ।।*
*अंतरिं स्मरतां स्वरूप साचे ।*
*अनाहत गर्जत गुप्त धनाला ।।"*

(तरि होय परम संतोष मनाला)

परमेश्वरप्राप्तीच्या आनंदाच्या सागरात अवगाहन करताना, दिव्यानुभूतीच्या चांदण्यात विहार करताना मिताक्षरांद्वारे ते आपल्या मनोवस्थेचे चित्रण करतात.

*"महानंदसमुद्र । पौर्णिमेचा पूर्णचंद्र*
*जो कां भुवनत्रय नरेंद्र*
*तो तूं संताचा सवंगाडे रे"*

परमेश्वरभक्तीशिवाय सोहिरोबानाथांनी काही बोधपर कविता लिहिल्या आहेत. या आशयालाही अध्यात्माचा स्पर्श आहे. सोहिरोबानाथांच्या काव्यविश्वात लक्षणीय ठरलेली 'हरिभजनाविण काळ घालवू नको' ही कविता त्यांच्या जीवनप्रणालीवर प्रकाश टाकते. त्यातील 'हरिभजनावीण काळ घालवू नको रे', 'अनुभवावीण मान हालवूं नको रे' व 'अंतरि'चा ज्ञानदिवा मालवूं नको रे' यांसारख्या आत्मानुभूतीचा स्पर्श असलेल्या उद्‌गारांना सुभाषितांची रमणीयता प्राप्त झालेली आहे. त्यांना प्रतीत झालेल्या पूर्ण ब्रम्हाचे दर्शन त्यांनी :

"सोहिरा म्हणे पूर्ण ज्योती । तेथे कैंचि दिवस राति" या अनुभवाद्वारे प्रकट केले आहे. 'मी कोण कोठुनि आलो' या कवितेत ते म्हणतात : "मी कोण

आहे ? मी कोठून आलो याचे भान ठेवा. मी कोणते कर्म केले ? मला नरदेह कशामुळे प्राप्त झाला ? सुखदुःखाची जाणीव मला कशामुळे झाली याचा विचार करा.''

ते पुढे म्हणतात, ''ज्ञानाचा अभ्यास करा. निजवस्तूचे भान ठेवा. ध्यानाने त्यागमय जीवन जगण्याचा प्रयत्न करा. मग निर्गुण, नित्यानंदामुळे पूर्ण ब्रह्माची प्राप्ती होऊ द्या. कामक्रोधावर मात करून, इंद्रियदमन करून ब्रह्माची प्रतीती येईल याचा अंतर्मनात शोध घ्या. विवेकसामर्थ्याने यातील जे शक्य असेल ते घ्यावे. त्यामुळे मन दृश्यातील व्हावे. भवसागर तरून ब्रह्मसुखाची प्राप्ती व्हावी.''

संतसज्जनांना तुम्ही सतत वंदावे. निंदा करणे सोडून द्यावे. सुसंगतीमुळे हा जीवन सद्‌गतीला पावेल. मोक्षरूपी अक्षय आनंदाची प्राप्ती होईल असे ते सांगतात. ईश्वराच्या नामस्मरणात मग्न राहण्याविषयी आवाहन करताना ते म्हणतात :

*''त्वरित घेई तूं परम पियूष, आयुष्य गेले सरत रे''*

सोहिरोबानाथांनी माणसाच्या आसक्तिमय जीवनाचे, स्वार्थलंपट वृत्तीचे वर्णन अनेकदा केलेले आहे. उदा -

*माझें माझें म्हणून जन हे लंपट गेले पहात तया ।*
*कटकट करिसी कटकट धरिसी झटपट भुलसी लुट घ्याया ।*

सोहिरोबानाथांनी आत्मानुभूतीचे प्रकटीकरण करण्यासाठी आपले काव्य लिहिले. त्यांचे हर्षामर्श, तापत्रयाचे दुःख व दिव्यानुभूतीमुळे निर्माण झालेल्या आनंदोर्मी अप्रत्यक्षपणे त्यांच्या कवितेत प्रकट झाल्या आहेत. उदा. -

*''अवघें दुमदुमिलें आकाश । दिन - रजनी - रहित प्रकाश*
*झाला निरंजनींच विकास । आता पुन्हा जन्माला नाही येणे हो''*

या ओळींतून ब्रह्मसुखाच्या संवेदनेचे वर्णन त्यांनी केलेले आहे. या साऱ्या कवितांतून त्यांची तदात्मता प्रकट झाली आहे. सकल चराचरावर अधिसत्ता गाजविणाऱ्या परमेश्वरावर त्यांची अनन्य निष्ठा आहे. तो अविनाश आत्माराम आहे. भक्तकाजासाठी तत्परता दाखविणारा, त्यांच्या मनोरथांची निरंतर परिपूर्ती करणारा कल्पद्रुम आहे, हा श्रद्धाभाव त्यांच्या अंतःकरणात वसत असल्यामुळे त्यांच्या कवितेला चित्कळेचा स्पर्श झालेला आहे. त्यातील भावनाशय समजून घेणे हा स्वतंत्र विवेचनाचा विषय आहे. 'रामरूप झाले प्राणी' या कवितेत सोहिरोबानाथ म्हणतात :

'अंतरी दीपक उजळलेला आहे. अभिमान गळालेला आहे. सर्वस्व निर्वाणात

मिळून गेलेले आहे. मीठ आणि पाणी परस्परांत मिसळून जावे' त्याप्रमाणे निरंजन आणि मन यांची एकरूपता झालेली आहे.' अद्वैताचा पुरस्कार त्यांनी येथे केलेला आहे. अहंभाव नष्ट झाल्यानंतरच्या अवस्थेचे वर्णन करताना ते म्हणतात :

*''मीपणा तुटी, पडली मिठी*
*आजि विरक्ती वाटली मोठी''*

(सांपडला आजी देव मला)

स्वरूप कळलें, मीपण गळले, मिळलें आनंदाते 'काय म्यां सांगों गे माये' मध्ये विश्वचैतन्याच्या विराटशक्तीचे विस्मयाने भारून टाकणारे वर्णन सोहिरोबानाथांनी केलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या काव्यसौंदर्याचे स्मरण येथे झाल्यावाचून राहत नाही कवी उद्गारतो :

*'' काय म्यां सांगो गे माये । नवल जाहलें*
*चैतन्य सिंधुमाजी, सैंधवकाया डी डोळे*
*निर्वात कर्पुरदीपी, प्रणवपतंग बोले*
*आकाशावरी जळ त्यावरी कमळिणी खोले*
*हात नाही पाय, ऐसे भ्रमर गुंतले*
*नामचि नुरतें केलें, लया आमोर्दे नेलें*
*सोहिरा म्हणे हें आंगाथिलें, ते रुपाविण देखिलें''*

सोहिरोबानाथांनी निर्वाणापूर्वी 'दिसणे हे सरलें' ही कविता लिहिली. तीत ते म्हणतात :

*''दिसणे हे सरलें अवघें प्राक्तन हे मुरलें.*
*आलों नाही गेलों नाही मध्ये दिसणें हे भ्रांती*
*जागृत होतां स्वप्नचि हरपे कर्पुर न्यायें जग हरलें*
*दिसणें हाचि जन्म योगियां ना दिसणें हा मृत्यू म्हणा*
*गैबिप्रसादें गैबचि झालें आप आपणामधिं लपलें*

संत सोहिरोबानाथांच्या अध्यात्मपर कवितेत जीवनचिंतनाचे परिणत रूप प्रकटले आहे. ही आशयघन कविता अक्षय आनंद देणारी आहे.

▲▲